धारप,स्टेट बँकेतले पुणतांबेकर,सिनेक्षेत्रातले बाळासाहेब सरपोतदार, प्रा. गोपाळ पेठे, नाशिकच्या गोखले महाविद्यालयाचे प्राचार्य गोसावी, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य एस. बी. लिमये, गणपुले क्लासेसचे दादा गणपुले ही सारी मंडळी सहाध्यायी म्हणून लाभली. चितळे बंधू मिठाईवाल्यांतील कै. राजाभाऊ चितळे यांनी तर वर्गबंधूप्रमाणे नव्हे तर भावासारखं प्रेम केलं. अमेरिकेत जाऊन शिकणारी मुलं एकीकडे कामं करुन पैसे कमावतात याचं आजही सुशिक्षित मध्यमवर्गीयांना कौतुक वाटतं. मी वृत्तपत्र टाकायचो आणि त्याचवेळी राजाभाऊ घरच्या व्यवसायात मदत म्हणून दूध पोचवायचा. त्यामागे तरी आणखी वेगळी भूमिका कोठे होती? भविष्यात नाव कमावलेल्या मित्रांनी माझ्या व्यक्तिमत्वामध्ये दिलेले योगदान मोजणे अशक्यच. या सर्वांसह खेळ, एन. सी. सी., संघ शाखा, गप्पा, अभ्यास यामुळे खेड्यातून आलेल्या या ग्रामीण बुजणा-या विद्यार्थ्याचे मडके पक्के भाजून तयार झाले नसते तर नवल.

बी.कॉम्च्या शेवटच्या वर्षात गेलो आणि वडिलांचा पोटदुखीचा आजार सारखा उफाळू लागला. अखेर मुंबईला जाऊन अल्सरची शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय वडिलांनी घेतला. 1953 मध्ये ही शस्त्रक्रिया मोठी अवघड मानली जाई. त्यावेळी माझी सहामाही परीक्षा होती. त्यामुळे वडिलांनी मी येण्याची गरज नाही असे निक्षून सांगितले. पण ते व्हायचे नव्हते. मला मुंबईला जावेच लागले. शेवटचा पेपर सुरु असतानाच वडील गेल्याचा दूरध्वनी महाविद्यालयाचे प्राचार्य टी. एम्. जोशी यांना आला. ऑक्टोबर 1953 ला अवघ्या 19व्या वर्षी अफाट मुंबईचे पहिले दर्शन घेतले ते दादर-स्मशानभूमीमध्ये वडिलांच्या अंतिम दर्शनासाठी. ही कसली मुंबई असा विचार त्यावेळी मनात आला.

परंतु नियतीचा खेळ मोठा विचित्र असतो. पदवी परीक्षा होईपर्यंतचे दिवस वडिलांच्या उरल्या-सुरल्या पैशांमध्ये कसेबसे काढले. आई, शिकणारा धाकटा भाऊ यांची जबाबदारी, पदवी मिळाली पण नोकरी मिळायची होती. कामाची तयारी असलेल्याला मुंबईत मरण नाही असे तेव्हाही मानले जाई. त्यामुळे नोकरीच्या शोधार्थ मुंबई गाठायचा निर्णय घेतला. मुंबईत राहायचे कोठे हा मोठाच प्रश्न होता. पण इथेही वडिलांची माणसांची कमाई कामी आली. त्यांचे महाविद्यालयीन काळातील मित्र कै. शंकर जोशी मुंबईकर होते. मित्र हयात नव्हते. पण त्यांच्या पत्नी कै. उमाकाकूंनी मोठ्या मनाने नोकरी मिळेपर्यंत तू आमच्याकडे राहा म्हटले. जोशी कुटुंबीयांचा अपार स्नेह लाभला.

मऊ लागले म्हणून कोपराने खणायचे हे माझ्या स्वभावात नव्हते. जवळ-जवळ वर्षभर तिथे होतो. सुरुवातीला न्यु इंडिया इन्शुरन्स कंपनीत लागलो. ती तेव्हा खाजगी कंपनी होती. पण काही महिन्यात अकाऊटंट जनरलच्या कार्यालयात अप्पर डिव्हीजन क्लार्कची सरकारी नोकरी मिळाली आणि मी पेईंगगेस्ट म्हणून खेतवाडीत पंडित पलुस्करांकडे राहायला गेलो. जवळ-जवळ दीड वर्ष तिथे होतो. याच काळात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियातही नोकरीसाठी निवड झाली. पण मोल. सहा आणे राईसप्लेट जेवणारा मी दहा रुपये कमी असताना ती नोकरी घेणे शक्यच नव्हते. पण पोटार्थी असलो तरी ज्ञानार्थीही व्हायचे होते आणि संघकार्य तर सतत खुणावत होते. दररोज रात्री आझाद मैदानावरील शाखेत गेल्याशिवाय दिवस पूर्ण होत नसे. एकीकडे 'लॉ' चे शिक्षण घ्यायचे ठरविले. चर्चगेटच्या केसी लॉ कॉलेजमध्ये सायंकाळच्या अभ्यासक्रमासाठी नाव नोंदविले. मग जायला-यायला सोयीचे म्हणून आणि संघबंधूंचा सहवास हवा म्हणून चर्चगेटच्या ईश्वर भवन येथील संघ कार्यालयात मुक्काम हलविला. त्या कार्यालयात शौचालय-न्हाणीघर काही नव्हते. इमारतीत नोकरांसाठी असलेल्या शौचालयात जाताना किंवा शेजारच्या मोटार गॅरेजच्या नळावर आंघोळ करताना मनात फक्त पुढे जायची जिद्द होती. दिवस खरं तर कठीण होते. पुण्यात आई-भावाला पैसे पाठवायचे, इथे एकट्याने राहायचं. त्यामुळे शनिवारी अर्ध्या दिवसाचे कार्यालय संपल्यानंतर डेक्कन क्वीनने पुण्याला जात असे. रविवारी सुट्टी, सोमवारी डेक्कन क्वीनने कामावर असे करीत असे. मुंबईत चार वेळा बाहेर जेवण्यापेक्षा मुंबई-पुणे-मुंबई प्रवास करुन आई-भावाची भेट हे त्या मागे कारण होते. पण तक्रार न करता आनंदाने सर्व करीत होतो. कर्तव्याची झिंग, पुढे जायची जिद्द, कडवटपणा मनाला शिवू देत नसे. खरं तर मी इतकी व्यवधानं स्वतःला लावून घेतली होती की मनाचे कौतुक करायलाही वेळ नसे. पुढे आयुष्यात जेव्हा-जेव्हा संकटं आली त्यातून पुढे जायला याच सवयीने बळ दिले. 1956-57 मध्ये पुण्याहून आणलेली सायकल मुंबईत माझी खरी सोबती होती. सकाळी भरभर आवरुन चर्चगेटहून सायकलने 3-4 किलोमीटरवरील बॅलार्ड इस्टेटच्या ऑफिसात, तिथून पुन्हा सायंकाळी चर्चगेटलाच लॉ कॉलेजमध्ये, मग तिथून एक किलोमिटरवर विधानसभेच्या म्युझियमजवळील स्क्वेअर मिल कँटीनमध्ये रात्रीचे जेवण, त्यानंतर आझाद मैदानावरील रात्र शाखा आणि मग झोपायला पुन्हा संघ कार्यालय असा भरगच्च दिनक्रम असे.

पदवी घेतल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रचारक म्हणून काही वर्षे तरी काम करण्याची इच्छा वडिलांच्या मृत्यूमुळे अपूर्ण राहिली



जीवावरची लढाई जिंकल्यानंतर श्री. अटलजींनी दिलेला सत्कारमय आशीर्वाद